महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

मंगळवार ■ २२ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# मुंबई बॉम्बस्फोट : सर्वच दोषींची निर्दोष मुक्तता

## हायकोर्टाचा धक्कादायक निकाल ■ महाराष्ट्र एटीएस सर्वोच्च न्यायालयात जाणार!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला ११ जुलै २००६ रोजी हादरवून सोडणाऱ्या लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणावर आज मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत धक्कादायक निकाल दिला आहे. या स्फोटांमध्ये २८४ जणांचा मृत्यू झाला होता, तर ८०० पेक्षा अधिक जखमी झाले होते. या प्रकरणात तपास यंत्रणांनी अटक केलेल्या १२ आरोपींपैकी सत्र न्यायालयाने ४ आरोपींना फाशीची, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा हा निकाल पूर्णपणे फिरवत, सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

उच्च न्यायालयाच्या या निकालानंतर अनेकांना धक्का बसला असून, सध्या पुण्यातील येरवडा कारागृहात असलेले बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी लवकरच बाहेर येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निकालावर सर्व स्तरांतून आश्चर्य व्यक्त होत असून, ज्येष्ठ विधिज्ञ आणि खासदार उज्ज्वल निकम यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. आता, या प्रकरणी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) सर्वोच्च न्यायालयात



धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. २००६ च्या पश्चिम रेल्वे साखळी बॉम्बस्फोट खटल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मोक्का विशेष न्यायालयाने या प्रकरणात ५ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा आणि ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, तर एका आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, मृत्युदंडाच्या संदर्भात आणि दोषी आरोपींच्या अपीलवर उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती किलोर आणि न्यायमूर्ती चांदक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती. या खटल्यात अतिरिक्त सॉलिसिटर जनरल राजा ठाकरे आणि विशेष सरकारी वकील चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली होती.

जुलै २०२४ पासून या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती आणि २७ जानेवारी २०२५ रोजी अभियोग तसेच बचाव पक्षाचे युक्तिवाद पूर्ण झाले होते. आज, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकाल दिला, ज्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपील मान्य करण्यात आले. विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे.

दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने म्हटले आहे की, या खटल्याच्या विशेष अभियोक्तांशी सल्लामसलत करून आणि निकालाच्या सखोल विश्लेषणानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. महाराष्ट्र एटीएसने मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे. सर्वोच्च न्यायालयात जाण्यापूर्वी उच्च न्यायालयाच्या निकालाचे अवलोकन करून त्याचा सखोल अभ्यास केला जाईल आणि सरकारी वकिलांशी चर्चा करूनच ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

---




## एमआयडीसीच्या उघड्या चेंबरमध्ये पडून डोंबिवलीत एकाचा मृत्यू



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एमआयडीसीच्या उघड्या चेंबर मध्ये पडून एका इसमाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना कल्याण शीळ रोड टाटा पावर जवळ गांधी नगर येथे घडली आहे. रस्त्याने चालत असताना एका इसमाचा पाय घसरला आणि हा इसम थेट उघड्या असलेल्या चेंबरमध्ये पडला. चेंबर मध्ये पडल्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर जखम झाली. आजूबाजूच्या लोकांनी या इसमाला उपचारासाठी डोंबिवली मधील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र उपचारादरम्यान या इसमाचा मृत्यू झाला. बाबू धर्मा चव्हाण असे या मयत इसमाचे नाव आहे. या घटनेमुळे तीव्र संताप व्यक्त होत असून कल्याण शीळ रोडवर या भागात अनेकदा उघड्या चेंबर्स बाबत नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या मात्र एमआयडीसीने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

## अंबरनाथ: इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथमध्ये निर्माणाधीन इमारतीवरून पडून कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (ता. १९) सकाळच्या सुमारास घडली. या घटनेनंतर संतप्त कुटुंबीयांनी या कामगाराचा मृतदेह रुग्णालयातून इमारतीबाहेर आणून ठेवला होता. दरम्यान, यासंदर्भात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अंबरनाथ पूर्व कानसई कॉलेजच्या मागच्या बाजूला इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या इमारतीवर अंबरनाथ पश्चिमेच्या कमलाकरनगरमध्ये राहणारे अनिल गौरीशंकर कश्यप हे ४५ वर्षीय कामगार सुतारकाम करीत होते. सातव्या स्लॅबचे काम सुरू असताना ते पाय घसरून मागच्या बाजूला पडले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर त्यांना तातडीने उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यात आले; मात्र तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. बांधकामाशी संबंधितांनी आपला फोनही उचलला नाही, असा आरोप कश्यप यांच्या कुटुंबीयांनी केला. तसेच मध्यवर्ती रुग्णालयातून त्यांचा मृतदेह या इमारतीबाहेर आणून ठेवला होता. शिवाजीनगर पोलिसांनी या ठिकाणी धाव घेत अकस्मात मृत्यूची नोंद केल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश पाटील यांनी दिली.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta

https://www.facebook.com/jeevandeepnews

https://www.instagram.com/thane_jeevandeep

https://jeevandeepvarta.com


## एमएफएससीडीसी - एफटीआयआय दरम्यान सामंजस्य करार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुण्यातील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII) यांच्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने 'क्रिएटर्स इकॉनॉमी'च्या विकासासाठी कुशल मनुष् बळ विकासाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. ही केवळ सहकार्याची सुरुवात आहे. येत्या काळात महाराष्ट्र हे देशाच्या आणि जगाच्या क्रिएटर्स इकॉनॉमीचे केंद्र बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत फिल्म अँण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (FTII), पुणे आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ (MFSCDC), मुंबई यांच्यात सामंजस्य करार झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड आशिष शेलार, एफटीआयआयचे चे अध्यक्ष आणि अभिनेते आर.माधवन, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, एफटीआयआयचे कुलकुरू धीरज सिंग, पीआयबीच्या महासंचालक श्रीमती स्मिता वत्स शर्मा, राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मकदूम, एफटीआयआयचे प्राध्यापक संदीप शहारे, उप सचिव महेश वाव्हल, नंदा राऊत, चित्रनगरीचे सह व्यवस्थापकीय प्रशांत साजणीकर तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> आज सामान्य माणूसही एक क्रिएटर झालेला आहे. त्याच्या सर्जनशीलतेच्या जोरावर एक स्वतंत्र स्पेस त्याने निर्माण केली असून, ही क्रिएटिव्ह स्पेस आता मोनेटाईज होऊ लागली आहे. त्यामुळे क्रिएटर्स इकॉनॉमी ही आजची गरज बनली आहे. वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण आणि तात्रिकदृष्ट्या सक्षम मानव संसाधनाची नितांत आवश्यकता आहे. ट्रेनिंग आणि सर्टिफिकेशन ही दोन्ही गोष्टी या नव्या युगात अत्यंत आवश्यक आहेत. अनेकांकडे कौशल्य असूनही प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना व्यावसायिक संधी मिळत नाहीत. या करारामुळे ट्रेनिंग आणि सर्टिफिकेशन या दोन्ही गोष्टी मिळणार आहे.
>
> ● मुख्यमंत्री फडणवीस

## ठाणे जिल्ह्यात शिक्षकांच्या ऑनलाईन बदली प्रक्रीयेवर प्रश्नचिन्ह

### मंजुर पदापेक्षा जास्त शिक्षकांची नेमणुक झाल्याचा आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत जिल्हा परिषद शाळा मधील शिक्षकांच्या ऑनलाईन बदली प्रक्रिया सुरू आहे. मात्र, हि प्रक्रीया सदोष असल्यामुळे त्याचा फटका अनेक दुर्धर आजारी, दिव्यांग तसेच इतर शिक्षकांना बसल्याचे समोर आले आहे. अनेक शाळांमध्ये मंजुर पदांपेक्षा जास्त शिक्षकांच्या नेमणुका करण्यात आल्या असून यामुळे या जास्त नेमणुकांमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरल्याने ते पुन्हा बदलीस पात्र ठरत आहेत. या सर्व प्रकारामुळे शिक्षकांमधून संताप व्यक्त होऊ लागला आहे. या विरोधात न्यायालयात दाद मागितली जाईल, असा इशारा शिक्षक संघटनेने दिला आहे.

राज्य शासनाने जिल्हा परिषद शिक्षकांच्या ऑनलाइन बदली प्रक्रिया राबविण्याचे कंत्राट "विन्सी" या खाजगी सॉफ्टवेअर कंपनीला दिले आहे. या कंपनीकडून शिक्षकांना मार्गदर्शन करताना शाळांमध्ये मंजूर पदसंख्या विचारात घेऊन शिक्षकांच्या बदल्या केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले होते. प्रत्यक्षात अनेक शाळांमध्ये मंजूर पदापेक्षा अधिक शिक्षक बदली प्रक्रियेने पाठवले गेले असल्याचे समोर आले आहे. १८ जून २०२४ च्या शासन निर्णय नुसार बदली प्रक्रियेसाठी सात टप्पे निश्चित करण्यात आले असून शिक्षकांची संवर्ग एक ते संवर्ग चार मध्ये विभागणी केली आहे.

> विन्सी' कंपनी बदली पोर्टलवर संच मान्यतेनुसार शाळांमध्ये मंजूर पदांची यादी जाहीर करते. मात्र प्रक्रिया राबविताना याचा त्यांना विसर पडलेला दिसतोय. शासन निर्णयाप्रमाणे बदलीस पात्र नसताना सुद्धा चुकीच्या प्रक्रियेमुळे शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याने हा शिक्षकांवर अन्याय आहे. यात सुधारणा झाली नाहीतर शिक्षक समितीच्या माध्यमातून न्यायालयात दाद मागितली जाईल.
>
> विनोद लुटे, जिल्हाध्यक्ष, प्राथमिक शिक्षक समिती -ठाणे.












## औषध वितरणावर ऑनलाईन देखरेख

### ठाणे मनपाचे क्रांतिकारी पाऊल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिकेच्या आरोग्य केंद्रांत औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये तसेच मुदत संपलेल्या औषधांच्या साठ्याचे वितरण होऊ नये यासाठी आरोग्य विभागाने पाऊले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून औषध वितरण आणि मुदत संपलेली औषधे यांची माहिती तात्काळ मिळविण्यासाठी एक संगणकीय प्रणाली विकसित केली असून त्याद्वारे औषध वितरणाचे व्यवस्थापन आणि त्यावर देखरेख ठेवली जाणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २६ लाखांच्या पुढे गेली आहे. त्यापैकी ५२ टक्के नागरिक हे झोपडी आणि चाळीमध्ये राहतात. ठाण्यातील विद्यमान ३३ आरोग्य केंद्र आणि ६ प्रसुतीगृह आहेत. या आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांवर मोफत प्राथमिक दवाउपचार करण्यात येतात. या केंद्रावर येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. एकूणच आरोग्य सुविधेसाठी महत्वाची भूमिका बजावत असलेल्या आरोग्य केंद्रांना पालिकेच्या आरोग्य विभागाकडून मागणीनुसार औषधांचा पुरवठा करण्यात येतो. पुर्वीच्या व्यवस्थापनानुसार औषध पुरवठ्यासाठी बराच वेळ वाया जायचा आणि यामुळे काही वेळेस आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा निर्माण व्हायचा. काही वेळेस नजरचुकीने मुदत संपलेली औषधेही वितरित होऊन त्यावरून टिका होते, अशी बाब आरोग्य विभागाच्या निदर्शनास आली आहे. यामुळे आरोग्य विभागाने आता संगणकीय प्राणालीद्वारे औषधांचे वितरण करण्याचा निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी लवकरच सुरू केली जाणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील यांनी दिली.

## डोंबिवली भाजपत मोठ्या प्रमाणावर इनकमिंग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शहरातील पश्चिमेतील काँग्रेस, मनसेच्या कार्यकर्त्यांसह काही सामाजिक संघटना, मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी रविवारी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली हा पक्षप्रवेश झाला. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. त्या अनुषंगाने भाजपनेही निवडणुका डोळयासमोर ठेवून इतर पक्षातील कार्यकर्त्यांचे इनकमिंग सुरू केले आहे.

पक्षप्रवेशावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार रवींद्र चव्हाण यांनी म्हटले की, नवीन जिल्हाध्यक्ष नंदू परब यांच्या नेतृत्वाखाली अनेक विविध संघटना त्याचप्रमाणे काही पक्षातील कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याची इच्छा दर्शवली होती. त्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाकडे हे इनकमिंग सुरू झाले आहे. भविष्यात अजूनही अनेक जण प्रवेश करण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. तसेच येत्या २२ जुलैला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आहे. यानिमित्त संपूर्ण राज्यात रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. डोंबिवलीत दोन ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.

कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, डोंबिवली मंडल अध्यक्ष पवन पाटील, मंडल अध्यक्षा प्रिया जोशी, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, समीर चिटणीस आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष शशिकांत (गणेश) चौधरी, महीला ब्लॉक अध्यक्ष गिता चौधरी, बाळा सावंत, मनसेचे सुभाष कदम विजय शिंदे, तसेच डोंबिवली पश्चिमेमधील मनीष मोरे, राजेश नाना भोईर, अनेक महिला मंडळं, सामाजिक मंडळे, समाजसेवकांनी प्रवेश केला.

---

डोंबिवली पश्चिमचे मंडळ अध्यक्ष पवन पाटील म्हणाले, महाराष्ट्राच्या विकासासाठी भाजप परिवार कटिबद्ध आहे, हे विविध पक्षांतील कार्यकर्त्यांना पटवून देण्यात यश येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजप परिवारामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहेत, याचाच एक भाग म्हणून रविवारी (ता. २०) शेकडो कार्यकर्ते भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजप परिवारात सामील झाले आहेत.

# ७/११ च मुंबई बॉम्बस्फोट प्रकरण नेमकं काय होतं?

११ जुलै २००६ रोजी मुंबईत झालेल्या भीषण बॉम्बस्फोटात 160 जणांनी आपले प्राण गमावले होते. आजही त्या बॉम्बस्फोटाचा विचार करून देशवासीयांच्या मनात धडकी भरते. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील लाइफलाइनमध्ये म्हणजेच लोकलमध्ये सात साखळी बॉम्बस्फोट झाले होते. त्यात २०९ लोक मृत्यूमुखी पडले होते, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले होते. 11 मिनिटांच्या अंतराने लोकल ट्रेनमध्ये सात बॉम्बस्फोट झाले होते. आता या प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई हायकोर्टाकडून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

माटुंगा आणि मीरा रोडदरम्यान हे साखळी बॉम्बस्फोट झाले होते. पाकिस्तानच्या 'लष्कर-ए-तैयबा' या दहशतवादी संघटनेनं हा कट रचला होता. दहशतवाद्यांनी प्रेशर कुकरमध्ये बॉम्ब बनवले होते. मकोकाच्या विशेष न्यायालयाने २०१५ मध्ये १२ जणांना शिक्षा सुनावली होती.

या प्रकरणात सप्टेंबर २०१५ मध्ये मकोका विशेष न्यायालयाने निकाल दिला होता. १२ जणांना शिक्षा सुनावण्यात आली होती. दहशतवाद्यांनी अतियशय क्रूर पद्धतीने हा हल्ला केला होता. त्यांनी सर्वसामान्य लोकांना लक्ष केलं होतं. या हल्ल्याने मुंबई शहर हादरलं होतं. लोकांमध्ये भीती आणि संतापही होता.




२००६ मध्ये मुंबईतील रेल्वे बॉम्बस्फोट हे ११ जुलै रोजी झालेल्या सात बॉम्बस्फोटांची मालिका होती . महाराष्ट्र राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील उपनगरीय रेल्वेवर ११ मिनिटांच्या कालावधीत हे बॉम्बस्फोट झाले. पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाच्या पश्चिम रेल्वे उपनगरीय विभागात धावणाऱ्या गाड्यांमध्ये प्रेशर कुकरमध्ये हे बॉम्बस्फोट करण्यात आले .

बॉम्बस्फोट आणि इतर हल्ल्यांमध्ये प्रेशर कुकरचा वापर करण्यात आला होता. पारंपारिक उच्च स्फोटकांपेक्षा अधिक शक्तिशाली असलेल्या थर्मोबॅरिक अभिक्रियेत आफ्टरबर्न वाढवण्यासाठी. पहिला स्फोट १८:२४ IST (१२:५४ UTC ) वाजता झाला आणि कामानंतरच्या गर्दीच्या वेळी १८:३५ पर्यंतस्फोट चालू राहिले . सर्व बॉम्ब चर्चगेट , पश्चिम रेल्वे मार्गाच्या शहराच्या मध्यभागी असलेल्या टोकापासून शहराच्या पश्चिम उपनगरांकडे धावणाऱ्या अनेक गाड्यांच्या प्रथम श्रेणीच्या "सामान्य" डब्यांमध्ये ठेवण्यात आले होते . ते माटुंगा रोड , माहिम जंक्शन , वांद्रे , खार रोड , जोगेश्वरी , भाईंदर आणि बोरिवली या उपनगरीय रेल्वे स्थानकांवर किंवा त्यांच्या जवळच्या परिसरात स्फोट झाले. गृहमंत्री शिवराज पाटील यांनी पत्रकारांना सांगितले की अधिकाऱ्यांना हल्ला होणार असल्याची "काही" माहिती होती, "पण ठिकाण आणि वेळ माहित नव्हती".

मकोका न्यायालयानं २०१५ मध्ये या प्रकरणी पाच जणांना फाशीची तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. पण या शिक्षेला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. तर राज्य सरकारनं पाच जणांच्या फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब व्हावं यासाठी याचिका दाखल केली होती.

आरोपींच्या वकिलांनी युक्तिवाद करताना म्हटलं होतं की, दहशतवादी हल्ल्यांच्या प्रकरणांमध्ये तपास संस्था धार्मिक भेदभाव करतात. या भेदभावातूनच तपास करून निरपराध व्यक्तींना गोवलं जातं आणि तुरुंगात टाकण्यात येतं. पुढे सबळ पुराव्याअभावी निर्दोष सोडलं तरी आयुष्यतला महत्त्वाचा काळ वाया गेलेला असतो.

उच्च न्यायालयाने निर्णय देताना म्हटलं की, एटीएसने बळजबरीनं कबुलीजबाब नोंदवल्याचं आरोपींच्या वकिलांनी सिद्ध केलं. सरकारी पक्षाकडून हा गुन्हा सिद्ध करण्यासाठी ज्या साक्षी नोंदवल्या त्या विश्वासार्ह नाहीत. यामुळे गुन्हा सिद्ध करण्यात सरकारी पक्षाला अपयश आलं. त्यामुळे सर्व दोषींना निर्दोष ठरवून तुरुंगातून सोडण्यात यावं.

सरकारकडून या प्रकरणी विशेष सरकारी वकिलाच्या नेमणुकीत दिरंगाई झाली होती. उच्च न्यायालयाने यावरून फटकारल्यानंतर सरकारने राजा ठाकरे यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली होती. तरीही अंतिम सुनावणी होण्यास उशीर झाला. २०२४ च्या जुलैमध्ये सुरू झालेली सुनावणी सलग ६ महिने झाल्यानंतर खंडपीठाने निर्णय दिला. यासाठी ४४ हजारांपेक्षा जास्त कागदपत्रे आणि पुरावे तपासण्यात आले.

## नेमकं काय घडलं होतं?

११ जुलै २००६ च्या संध्याकाळी चाकरमानी ऑफिसमधलं आपलं काम संपवून घरी परतत होते. रेल्वे स्टेशनवर प्रवाशांची गर्दी होती. अनेकांना त्यांची नेहमीची लोकल पकडायची होती. परंतु हा आपल्या आयुष्याचा अखेरचा प्रवास ठरणार, याची कल्पनासुद्धा कोणी केली नव्हती. घरी पोहोचण्याआधीच ते प्रवासी दहशतवादी हल्ल्याचे बळी ठरले होते. एकामागून एक सात बॉम्बस्फोट झाले होते. अवघ्या काही मिनिटांतच होत्याचं नव्हतं झालं होतं. माटुंगा आणि मीरा रोड या रेल्वे स्थानकांदरम्यान ११ मिनिटांत ७ स्फोट झाले होते.

हे स्फोट माटुंगा रोड, माहीम, वांद्रे, खार रोड, जोगेश्वरी, बोरिवली आणि मीरा रोड स्थानकांवर झाले होते. या स्फोटांमध्ये २०९ लोक मृत्युमुखी पडले आणि ७०० हून अधिक जण जखमी झाले. पहिला स्फोट संध्याकाळी 4.35 च्या सुमारास झाला. त्यानंतर पुढील ११ मिनिटांत आणखी स्फोट झाले.

इतर दहशतवादी घटनांप्रमाणेच या हल्ल्यातही पाकिस्तानचा हात होता. लष्कर-ए-तोयबाने हा कट रचल्याचं तपासात दिसून आलं होतं. आझम चीमा हा मुख्य कट रचणारा होता. त्याने जिहादच्या नावाखाली तरुणांची दिशाभूल केली आणि त्यांना मुंबईत हल्ले करण्यासाठी पाठवले.

मुंबईतील या हल्ल्याला ७/११ बॉम्बस्फोट असंही म्हणतात. दहशतवाद्यांनी प्रेशर कुकर बॉम्बचा वापर केला होता. हे बॉम्ब आरडीएक्स, अमोनियम नायट्रेट, इंधन तेल आणि खिळ्यांपासून बनवले होते. त्यांनी हे बॉम्ब सात प्रेशर कुकरमध्ये ठेवले होते. त्यानंतर ते टायमर वापरून उडवले होते. स्फोटांनंतर, प्रेशर कुकरचे हँडल ढिगाऱ्यात सापडले होते. यामुळे तपासात मदत झाली आणि नंतर एक-एक करून सर्व गोष्टी उघड झाल्या होत्या.

ज्या साखळी बॉम्बस्फोटांनी अवघा देश हादरला होता, त्या खटल्यातील सर्व ११ आरोपी निर्दोष असल्याचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला. मुंबई उच्च न्यायालयाने तपासावरच ठपका ठेवत विशेष मकोका न्यायालयाने २०१५ मध्ये दिलेला शिक्षेचा निर्णय रद्द केला. हा निकाल देताना न्यायालयाने तपासातील तीन गोष्टींवर बोट ठेवले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. विशेष मकोका न्यायालयाने ३० सप्टेंबर २०१५ रोजी १२ पैकी ५ आरोपींना दोषी ठरवत फाशीची शिक्षा ठोठावली होती. आरोपींनी मकोका न्यायालयाच्या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

### मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोट, न्यायालय काय म्हणाले?

निकाल देताना मुंबई न्यायालयाने गंभीर निरीक्षणे नोंदवली आहेत. आरोपींविरोधात गुन्हा सिद्ध करण्यात सरकारी पक्षकार पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. किरकोळ शंका दूर करण्यापलीकडे काहीही सिद्ध करू शकले नाहीत. स्फोट घडवण्यासाठी कोणत्या प्रकारचे बॉम्ब वापरले गेले, हे सरकारी पक्षकार निश्चितपणे सांगू शकले नाही, असे न्यायालयाने म्हटले. ज्या साक्षीदारांची साक्ष नोंदवली गेली, न्यायालयाला ती विश्वासार्ह वाटत नाही. बॉम्बस्फोट झाल्यानंतर १०० दिवसांनी टॅक्सी चालक किंवा लोकल रेल्वेतील इतर लोकांना आरोपीला ओळखणे हे पटण्यासारखे नाही. गुन्हा कबूल करण्यापूर्वी त्यांना यातना दिल्या गेल्या होत्या, हा युक्तिवादही न्यायालयाने मान्य केला.

न्यायालय म्हणाले की, पोलिसांनी जे पुरावे गोळा केले, ज्यामध्ये बॉम्ब, बंदूका, नकाशे इत्यादी ते महत्त्वाचे नाही आणि सरकारी पक्ष आरोप सिद्ध करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने ११ आरोपींना निर्दोष ठरवले. या खटल्यात १२ आरोपी होते, यातील एका आरोपीचा मृत्यू झाला आहे. पाच जणांना फाशी, तर ७ जणांना झाली होती जन्मठेप ३१ जानेवारी २०२५ पर्यंत न्यायालयाने सलग सात महिने सुनावणी घेतली. सुनावणीनंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. मकोका न्यायालयाने पाच जणांना फाशीची शिक्षा, तर ७ जणांना जन्मठेप सुनावली होती.११ जुलै २००६ मध्ये मुंबईमध्ये लोकल रेल्वेमध्ये सात बॉम्बस्फोट करण्यात आले होते. पश्चिम उपनगरीय रेल्वेमध्ये हे स्फोट घडवण्यात आले होते. या स्फोटात १८९ लोकांचा मृत्यू झाला होता, तर ८२४ लोक जखमी झाले होते. गर्दीच्या वेळी म्हणजे ६.२४ ते ६.३५ या कालावधी हे बॉम्बस्फोट घडवण्यात आले होते.

## गीतासार



### अध्याय १७
### श्रद्धात्रयविभागयोगः

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् । उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १७-१० ॥

जे भोजन कच्चे, रस नसलेले, दुर्गंध येणारे, शिळे आणि उष्टे असते, तसेच जे अपवित्रही असते, ते भोजन तामसी लोकांना आवडते. ॥ १७-१० ॥

अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते । यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥ १७-११ ॥

जो शास्त्रविधीने नेमून दिलेला, यज्ञ करणे कर्तव्य आहे, असे मनाचे समाधान करून फळाची इच्छा न करणाऱ्या पुरुषांकडून केला जातो, तो सात्त्विक यज्ञ होय. ॥ १७-११ ॥

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् । इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १७-१२ ॥

परंतु हे भरतश्रेष्ठा (अर्थात भरतवंशीयांमध्ये श्रेष्ठ अर्जुना), केवळ दिखाव्यासाठी किंवा फळही नजरेसमोर ठेवून जो यज्ञ केला जातो, तो यज्ञ तू राजस समज. ॥ १७-१२ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् । श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १७-१३ ॥

शास्त्राला सोडून, अन्नदान न करता, मंत्रांशिवाय, दक्षिणा न देता व श्रद्धा न ठेवता केल्या जाणाऱ्या यज्ञाला तामस यज्ञ असे म्हणतात. ॥ १७-१३ ॥

## आरोग्य

### पॅकेज फूडवरील लाल, हिरव्या रंगाचा अर्थ काय?

भारतीय खाण्या-पिण्याचे शौकिन आहेत. काहींना चमचमीत, काहींना गोड पदार्थ खायला आवडतात. काही लोक खाण्याच्याबाबतीत शुद्ध शाकाहारी तर काही मांसाहारी पदार्थ खाणारे असतात. मांसाहारी पदार्थांमध्येही काही अंडी खातात तर काही अंडी खात नाहीत. हल्ली तर व्हेगन हा नवा प्रकाराही पाहायला मिळतो. व्हेगन असणारे लोक दूध, तूप, अंडी खात नाहीत तर केवळ प्लांट बेस्ड डाइट करतात. हल्ली पदार्थ बनवण्याऐवजी पॅकेज फूडला अधिक पसंती दिली जाते. पण, पॅकेज फूड खरेदी करताना तुम्ही काही गोष्टी व्यवस्थित पाहायला हव्यात. पॅकेज फूडवर विविध रंगाच्या खुणा असतात, ज्यांचा अर्थ असतो. केवळ डिझाइन म्हणून त्या देण्यात येत नाहीत. या खुणा आपल्याला पदार्थ कसा आहे मांसाहारी आहे, व्हेगन आहे का? याची माहिती देतं. आज आपण जाणून घेऊयात Packaged Food वरील लाल, हिरव्या, पिवळ्या रंगाचा अर्थ काय

**रंग आणि त्याचा अर्थ –**

लाल रंग : लाल रंग हा पदार्थ मासांहारी असल्याची माहिती देते. जर तुम्ही शाकाहारी असाल तर ज्या पदार्थांवर लाल रंगाचा डॉट आहे, असे पदार्थ खाणे टाळायला हवे.

हिरवा रंग : पॅकेज फूडवर हिरवा रंग असेल तर पदार्थ पूर्णपणे शाकाहारी असल्याचे सांगितले जाते. या पदार्थात मांस, अंडी आणि इतरो कोणत्याही प्राणीजन्य उत्पादन नाही.

निळा रंग : निळा रंग जर फूड पॅकेजवर असेल तर हे प्रॉडक्ट औषधांशी संबंधित आहे, हे समजावे. हे प्रॉडक्ट डॉक्टरांना न विचारता खाऊ नये.

पिवळा रंग : पॅकेज फूडवर जर पिवळ्या रंगाची खूण असेल तर त्यात अंड आहे असे समजावे. तुम्ही जर अंडी खात नसाल तर हे प्रॉडक्ट खाऊ नये.

काळा रंग : जर पॅकेज फूडवर काळ्या रंगाची खूण असेल तर त्यात मोठ्या प्रमाणात केमिकल्स असल्याचे दर्शवते. हे पदार्थ जास्त काळ खराब होऊ नये म्हणून तसेच त्याचा रंग आणि चव वाढवण्यासाठी यात केमिकल्सचा वापर केला जातो. असे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. डॉक्टरांच्या मते, काळ्या रंगाची खूण असलेले पदार्थ पचनसंस्था, यकृत आणि किडनीवर परिणाम करू शकतात.

**काय काळजी घ्याल?**

कोणताही पदार्थ खरेदी करताना पॅकेटवरील रंगीत खूण अवश्य पाहावी. विशेष करून लहान मुलांचे स्नॅक्स खरेदी करताना याची दक्षता घ्यावी.

## रायगड जिल्ह्याच्या प्रगतीत बँक ऑफ इंडियाचा मोठा वाटा

### – जिल्हाधिकारी किशन जावळे




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : बँक ऑफ इंडियाच्या रायगड विभागातर्फे अलिबाग येथे किसान दिन मोठ्या उत्साहात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती ,शासकीय योजना आणि बँकेच्या योजनांचे लाभ घेण्याचे आवाहन केले. बँक ऑफ इंडिया तर्फे बँक राष्ट्रीयीकरणाच्या स्मृती प्रित्यर्थ १९ जुलै हा दिवस किसान दिवस किसान दिवस आणि जुलै महिना किसान माह म्हणून साजरा केला जातो.या दिवशी बँकेच्या भारतातील आणि रायगड जिल्ह्यातील सर्व शाखांमध्ये शेतकरी, कष्टकरी आणि महिला यांचा सन्मान करून त्यांना कर्ज वाटप केले जाते. या कार्यक्रमास मुख्य महाव्यवस्थापक (CGM), सुनील शर्मा, एफ.जी. एम.ओ. मुंबई श्रीमती दीपान्विता साहनी-बोस, विभागीय व्यवस्थापक, रायगड विभाग, प्रकल्प संचालक, श्रीमती प्रियदर्शिनी मोरे, उप विभागीय व्यवस्थापक बिरेन चटर्जी,उप विभागीय व्यवस्थापक भरत सहाय, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक , रायगड विजय कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

बँक ऑफ इंडिया ही फक्त नावाला रायगड जिल्ह्याची अग्रणी बँक नसून सर्व कामात पहिल्या क्रमांकावर राहणारी बँक आहे असे कौतुक जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी यावेळी केले. या कार्यक्रमात सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या व मृत्यु पावलेल्या 2 लाभार्थीच्या वारसदारास 2- 2 लाख रुपायाच्या धनादेशचे वाटप करण्यात आले. मुख्य महाव्यवस्थापक सुनील शर्मा यांनी कृषी वित्त पुरवठ्यासाठी बँकेचा पाठिंबा आणि तयारी असल्याचे सांगताना बँकेच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन उपस्थिताना केले त्याच बरोबर जिल्हा प्रशासन बरोबर योग्य समन्वय राखून केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजना राबवण्यात बँक ऑफ इंडिया नेहमीच अग्रेसर राहील याबाबत उपस्थितांना आश्वासन दिले.

विभागीय व्यवस्थापक श्रीमती दीपन्विता सहानी बोस यांनी उपस्थितांचे स्वागत करून कृषी, एम.एस.एम.ई. आणि रिटेल फायनान्स मधील बँकेची भूमिका आणि शासकीय योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी दिलेल्या समर्थनाबद्दल सविस्तर माहिती दिली.

प्रकल्प संचालक श्रीमती मोरे यांनी जिल्ह्यातील बचत गट (SHG) वित्तपुरवठ्यात बँक ऑफ इंडियाच्या 80% पेक्षा जास्त योगदानाचे कौतुक केले.मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे वाटप करण्यात आली. जिल्हा व्यवस्थापक कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी विभाग प्रमुख सुधिर गायकवाड यांनी केले.

## राष्ट्रवादीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी जितेंद्र(पप्पू) तारमळे यांची नियुक्ती!




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत होण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये विविध तरुणांना जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर जबाबदाऱ्या टाकून त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ठाणे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षपदी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे कट्टर समर्थक जितेंद्र ( पप्पू) तारमळे यांची ठाणे जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन एक मोठी जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे. जितेंद्र तारमळे यांना ठाणे जिल्हा अध्यक्ष भरत गोंधळे यांनी नियुक्तीपत्र देऊन त्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या. अजित दादा पवार यांचे शाश्वत विकासाचे धोरण व राष्ट्रवादीचे पुरोगामी विचार ध्येय धोरणे व उद्दिष्टे आपल्या सर्व क्षेत्रातील घरोघरी पोहोचवण्यासाठी कठोर परिश्रम घेऊन राष्ट्रवादी पार्टीचे संघटन करून ती अधिक मजबूत कशी होईल येईल यासाठी सातत्याने प्रयत्न करीन असे नवनिर्वाचित ठाणे जिल्हा ग्रामीणचे उपाध्यक्ष जितेंद्र तारमळे यांनी दैनिक प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले.

त्यांच्या या नियुक्तीमुळे जिल्ह्यातून विविध संघटना व पदाधिकारी यांच्याकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवससेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना उपनेते विजय साळवी यांच्यातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भव्य विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास दीपस्तंभ फाऊंडेशन व मनोबल संस्थेचे संचालक यजुर्वेद्र महाजन हे मार्गदर्शन करणार आहेत. यातून आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे मनोबल व जिद्द वाढविण्यास मदत होणार आहे.

शुक्रवार, २५ जुलै रोजी सकाळी १० वाजता आचार्य प्रल्हाद केशव अत्रे रंगमंदिर, कल्याण येथे हा विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचा आणि त्यांचे शैक्षणिक मनोबल वाढवण्याचा शैक्षणिक उपक्रम आयोजित केला असून या कार्यक्रमात उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शक पुस्तिका मोफत देण्यात येणार आहे. चांगल्या आचरणाचे व अनुकरणाचे अंकुर आपल्या विद्यार्थ्यांवर उगवावेत या प्रामाणिक हेतूने या विद्यार्थी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे विजय साळवी यांनी सांगितले. या शैक्षणिक उपक्रमास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कल्याण शहर शाखा, छत्रपती शिवाजी चौक, कल्याण येथे गुरूनाथ पानेरकर (९८२०५५९४८४) यांच्याशी संपर्क साधून आपली प्रवेशिका प्राप्त करावी असे आवाहन शिसेनेचे उपनेते विजय साळवी यांनी विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना केले आहे.






## कल्याण पूर्वेत भव्य नशामुक्ती शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील सह योग सामाजिक संस्था आणि निलेश शिंदे फाउंडेशन आयोजित दारूमुक्त घर दारूमुक्त कल्याण पूर्व असे भव्य नशा मुक्ती शिबिर रविवार दिनांक 20, जुलै 2025 रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत संपन्न झाले . शिबिरात दारू व्यसन सोडविण्याकरता समुपदेशन आणि औषध उपचार करण्यात येते.दारू व्यसन सोडवण्यासाठी हार्मोन्स बॅलन्स आणि इम्यूनो थेरपी करून 48 तासात दारू सोडण्याची भावना, इच्छा बंद करणारे आयुर्वेदिक उपचार केले जातात. या अगोदरही हे शिबिर कल्याण पूर्व राबविले होते. कल्याण पूर्वेतील दोन हजारापेक्षा जास्त दारू पिणारे व्यसन मुक्त झाले. या शिबिरात दारू नशा मुक्तीवर उपचार करणारे डॉक्टर कृष्णा रामचंद्र भावले. यांना एक लाख रुग्णांचा अनुभव असणारे व्यसनमुक्ती आरोग्य तज्ञ डॉक्टर बी ए एम एस एमडी, एम ए फ्युचोलॉजी, डी पी एस यन्यूरो फ्युचोलॉजी हे तज्ञ डॉक्टर रुग्णांवर उपचार करतात.हे आरोग्य शिबीर यशस्वी करण्याकरता समाजसेवक विजय भोसले, मुकुंद गायधनी सुभाष म्हस्के, कालिदास कदम,मनोज नायर, यांनी विशेष मेहनत घेतली.

## आजचे राशि भविष्य



**मेष**

तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**

व्यवसायात फायदा होईल.दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे. व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**मिथुन**

महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. विरोधक

**कर्क**

विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**सिंह**

काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी सहकाऱ्यांची मदत मिळेल. मुलांकडून

**कन्या**

तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.. तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर मानसिक शांती मिळेल.

**तूळ**

तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**वृश्चिक**

विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. आज तुम्हाला नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

**धनु**

आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाईल. व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल आणि महत्त्वाच्या व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**मकर**

कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**कुंभ**

कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**मीन**

तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे.




# मुंबई, ठाणे पालघरसाठी हवामान विभागाचा अलर्ट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईत :** मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहराचा वेग मंदावला आहे. पूर्व आणि पश्चिम उपनगरे तसेच मध्य मुंबईतील अनेक सखल भागात पाणी साचले आहे. सततच्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले आहे. ज्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. अंधेरी सबवेमध्ये दोन ते तीन फूट पाणी साचल्याने वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे.

हवामान विभागाने (IMD) मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांमध्ये पुढील ४८ ते ७२ तासांसाठी यलो इशारा जारी केला आहे. त्याच वेळी, रायगड जिल्ह्यातही ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. तिथे मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने नागरिकांना समुद्र किनाऱ्यावर जाऊ नये असे आवाहन केले आहे. कारण समुद्राच्या लाटांची उंची वाढू शकते. आज मुंबईत दोनदा भरती येण्याची शक्यता आहे. पहिली भरती सकाळी ९:१९ वाजता आली. त्याची उंची सुमारे ३.८८ मीटर होती. दुसरी भरती रात्री ८:३१ वाजता येईल, ज्याची उंची सुमारे ३.४२ मीटर असण्याचा अंदाज आहे. याशिवाय, कमी भरतीची वेळ पहाटे २:०८ आणि दुपारी ३:१३ होती. अशा परिस्थितीत भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी शहरातील तुंबलेल्या नाल्या आणि ड्रेनेज सिस्टीमवर परिणाम करू शकते. मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका पश्चिम उपनगरांना बसला. अंधेरी, मालाड, कांदिवली, बोरिवली भागातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत. अंधेरी सबवे पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे, ज्यामुळे वाहतूक बंद करावी लागली. सकाळी पाऊस थांबल्यानंतर, ड्रेनेजचे काम सुरू करण्यात आले आहे. घाटकोपर, कुर्ला आणि मुलुंड या पूर्व उपनगरांमध्ये काही तासांसाठी पावसाचा जोर मंदावला. ज्यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

**प्रशासनाने एनडीआरएफ आणि बीएमसीच्या पथकांना हाय अलर्टवर ठेवले आहे. प्रशासन आणि हवामान विभागाने नागरिकांना अनावश्यकपणे घराबाहेर पडू नका, समुद्र किनाऱ्यावर जाऊ नका आणि पाणी साचलेल्या भागांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. जर पावसाचा वेग असाच सुरू राहिला तर येत्या काळात लोकल ट्रेन आणि रस्त्यांवरील वाहतुकीवर अधिक परिणाम होऊ शकतो.**



# सूरज चव्हाण राजीनामा द्या - अजित दादांचे आदेश

## छावाच्या विजयकुमार पाटलांना केलेली मारहाण भोवली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा गेम खेळत असलेला व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासमोर पत्ते फेकले होते. यानंतर युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या विजयकुमार पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली होती. आता सूरज चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याचे आदेश अजित पवार यांनी दिले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोशल मीडियावर सूरज चव्हाण यांच्या राजीनाम्याबाबत पोस्ट केलीय. अजित पवार यांनी म्हटलं की, लातूरमध्ये घडलेल्या अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह घटनेच्या पार्श्वभूमीवर, मी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदाचा त्वरित राजीनामा द्यायच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पक्षाच्या मूल्यांच्या विरोधात जाऊन केले जाणारे वर्तन कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही, यासाठी हा कठोर निर्णय घेतला आहे.

**काल लातूरमध्ये घडलेल्या अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह घटनेच्या पार्श्वभूमीवर, मी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांना त्यांच्या पदाचा त्वरित राजीनामा द्यायच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. पक्षाच्या मूल्यांच्या विरोधात जाऊन केले जाणारे वर्तन कोणत्याही स्थितीत स्वीकारले जाणार नाही, यासाठी हा कठोर निर्णय घेतला आहे.**

■ अजित दादा पवार

सूरज चव्हाणकडे राष्ट्रवादी काँग्रेसचं युवक प्रदेशाध्यक्षपद होतं. अजित पवार यांच्या अत्यंत जवळचा कार्यकर्ता अशीही ओळख होती. राष्ट्रवादीत फुटीच्या आधीही युवक कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. मूळचे लातूर जिल्ह्यातल्या शिरूर अनंतपाळचे ते रहिवासी आहेत.

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अजित पवार यांच्यासोबत जे गेले त्या पहिल्या १० जणांमध्ये सूरज चव्हाण होता. २०१९ मध्ये अजित पवार यांनी पहाटे शपथ घेतली तेव्हा आमदारांना परत आणण्यातही सूरज चव्हाणची भूमिका महत्त्वाची ठरली होती. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही मारहाणीच्या घटनेवर नाराजी व्यक्त केली होती.

लातूरमध्ये मारहाण झाल्याचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. या व्हिडीओत सूरज चव्हाण हे छावाच्या कार्यकर्त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचं दिसून आलं होतं.



# अनधिकृत बांधकामांना पालिका अधिकारीच जबाबदार

## उच्च न्यायालयाचे वसई मनपाला खडेबोल

## सहाय्यक आयुक्त व उपायुक्तांवर कारवाईची टांगती तलवार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार :** अनधिकृत बांधकामाला एमआरटीपी अंतर्गत केवळ नोटीस बजावून निष्कासन करवाई करण्यास जाणूनबुजून दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने पालिका आयुक्तांना दिले आहेत.

वसई गाव मौजे चुळणे येथील सर्व्हे क्रमांक. 123 हिस्सा क्रमांक: 1 ते 6 या खासगी जागेतील अनधिकृत बांधकाम अविनाश डॉमनिक घोसाळ यांनी प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका (WRIT PETITION NO.16958 OF 2024) दाखल केलेली होती. या याचिकेत महाराष्ट्र राज्य व वसई-विरार महापालिका यांना प्रतिवादी केले होते.

वसई गाव मौजे चुळणे येथील सर्व्हे क्रमांक. 123 हिस्सा क्रमांक: 1 ते 6 या खासगी जागेतील अनधिकृत बांधकाम अविनाश डॉमनिक घोसाळ यांनी प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका (WRIT PETITION NO.16958 OF 2024) दाखल केलेली होती. या याचिकेत महाराष्ट्र राज्य व वसई-विरार महापालिका यांना प्रतिवादी केले होते.

20 जून 2025 रोजीच्या या याचिकेवरील सुनावणीत न्यायमूर्ती ए. एस. गडकरी व कमल खता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. निर्णय दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत या संबंधीचा

**या सगळ्या नाट्यमय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने वसईतील अनधिकृत बांधकामांत दिलेला निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या निर्णयावर वसई-विरार महापालिका सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजीत मुठे यांच्याविरोधात कारवाई करते; की न्यायालयाच्या आदेशांचा अवमान करते? याकडे वसई-विरारकरांचे लक्ष लागून राहिले आहे.**

अनुपालन अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेशही आयुक्तांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजीत मुठे यांच्यावर कारवाईची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

सदर प्रकरणात सहाय्यक आयुक्त मनोज वनमाळी व उपायुक्त अजीत मुठे यांच्या वतीने महापालिकेच्या वकील स्वाती सागवेकर यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले होते. सदर प्रतिज्ञापत्रात संबंधित बांधकामाचे नियमितीकरण करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. शिवाय, सदर बांधकाम थांबविण्यात आले असून त्या संदर्भातील छायाचित्र न्यायालयात सादर करण्यात आलेली होती. परंतु संपूर्ण प्रकरणाचे आकलन करता सदर बांधकाम मालकीच्या जागेवर असले तरी ते पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

# पालघर जिल्ह्यात वेळगाव येथे नव्या विद्युत सबस्टेशनची उभारणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर ता. २० :** केंद्र सरकारकडून मुंबईसह एमएमआर क्षेत्रात ग्रोथ हब उभारले जाणार असल्याने येथे मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे, डेटा सेंटर, सेवा क्षेत्र निर्माण होणार आहे. त्याची तयारी म्हणून आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेड पालघर जिल्ह्यात वेळगाव पॉवर ट्रान्समिशन लिमिटेडच्या माध्यमातून ४०० केव्हीचे जीआयएस उच्चदाब वीज केंद्र उभारणार आहे. त्यानुसार केंद्राची उभारणी आणि संचालनासाठी महापारेषणसह सात कंपन्या इच्छुक असल्याचे समोर आले आहे.

केंद्र सरकार देशाच्या अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी देशभरात महाराष्ट्र (एमएमआरमध्ये), गुजरात, तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांत ग्रोथ हब उभारणार आहे. या हबमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग, आयटी कंपन्या, सेवा क्षेत्र असणार आहेत. त्यामध्ये काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार निवारा, वाहतुकीच्या सुविधांसह वेगवेगळ्या प्रकारच्या पूरक सोयीसुविधा उभाराव्या लागणार आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात विजेची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे राज्यातील वीज केंद्रातील वीज एमएमआरमध्ये वाहून आणून ती वाढवण बंदर, डेटा सेंटर, उद्योगधंद्यांना पुरवणे शक्य होणार आहे.

त्यामुळे त्याचे नियोजन करून योग्य रीतीने विजेचा पुरवठा करता यावा म्हणून वेळगाव इन्ड्रास्टेट योजनेत पालघरजवळ वेळगाव येथे नवीन ४००/२२० केव्ही जीआयएस सबस्टेशन उभारले जाणार आहे. त्यासाठी तांत्रिक बोलीच्या आधारे सात कंपन्या उभारणी आणि संचलनासाठी पात्र ठरले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



# मृत्यूच्या दाढेतून जाते शाळेची वाट !

## डहाणू तालुक्यात विद्यार्थ्यांना जीव धोक्यात पार करावी लागते सूर्या नदी

## विद्यार्थ्यांसह रुग्ण आणि वृद्धांना धोकादायक प्रवासाचा फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कासा, (बातमीदार):** डहाणू तालुक्यातील कोसेसरी, भवाडी येथील नागरिकांना दरवर्षीप्रमाणे यंदाही जीव धोक्यात घालून सूर्या नदी पार करीत प्रवास करावा लागत आहे. रुग्ण, वृद्ध आणि विशेषतः विद्यार्थी यांना या धोकादायक प्रवासाचा मोठा फटका बसत आहे. दररोज ६० ते ७० विद्यार्थी शिक्षणासाठी लाकडी होडी किंवा तराफ्यावरून नदी पार करतात. या परिसरातील नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक आणि ग्रामपंचायतीकडून गेल्या अनेक वर्षांपासून नदीवर पूल बांधण्याची मागणी होत होती. माजी जिल्हा परिषद सदस्य शैलेश करमोडा यांच्या पुढाकाराने व अनेक ग्रामस्थांच्या पाठपुराव्यामुळे लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू होण्याच्या आदल्या दिवशी पुलासाठी निधी मंजूर करण्यात आला. तत्पूर्वीच पालघरचे माजी खासदार राजेंद्र गावित, आमदार विनोद निकोले, पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम आणि आमदार श्रीनिवास वनगा यांच्या उपस्थितीत पुलाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते. त्यानंतर प्रत्यक्षात चार महिने कोणतेही काम सुरू झाले नाही.

१५ मार्च २०२४ रोजी पुलाच्या कामास सुरुवात झाली; परंतु सध्या या पुलाचे केवळ ४० टक्के काम पूर्ण झाले असून, पावसाळ्यामुळे काम थांबवण्यात आले आहे. यामुळे यंदाही येथील नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सूर्या नदी पार करताना जीवावर उदार होऊन लाकडी होड्या किंवा तराफ्यांचा वापर करावा लागत आहे. या परिसरातील विद्यार्थी सोलशेत, सारशी, तलवाडा व कासा येथे पुढील शिक्षणासाठी जातात; मात्र नदीवर पूल नसल्यामुळे त्यांना सायवनमार्गे १८ ते २० किमीचा वळसा घालावा लागतो. या मार्गावर सार्वजनिक वाहतुकीचे साधन अत्यल्प असल्याने आणि प्रवासाचा वेळ व खर्च दोन्ही वाढल्याने बहुतांश विद्यार्थी नदी पार करण्याचा धोकादायक पर्याय निवडतात.

**गेल्या वर्षी निधी मंजूर झाला आणि काम सुरू झाले; मात्र पूल अपूर्ण असून यंदाही मुलांना आणि ग्रामस्थांना जीवघेणा प्रवास करावा लागतो. त्यामुळे पावसाळा संपताच काम पुन्हा सुरू व्हावे, ही आमची मागणी आहे.**

**- शैलेश करमोडा,**
**माजी जिल्हा परिषद सदस्य**



कुणबी समाज सेवा संघ, बदलापूर यांच्या वतीने कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार किसन कथोरे यांनी उपस्थित राहून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांचा सत्कार करत त्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नवीमुंबई मनपाची विक्रमी करवसुली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** मालमत्ता थकबाकीवर आकारण्यात आलेला दंड पनवेल महापालिकेने ९० टक्क्यांपर्यंत माफ केला आहे. या सवलतीनंतर अवघ्या तीन दिवसांत महापालिकेच्या तिजोरीत सुमारे नऊ कोटींपेक्षा अधिक रक्कम गोळा झाली आहे. दंड माफीच्या निर्णयानंतर १८ जुलैपासून महापालिकेने अभय योजना जाहीर केली आहे. योजनेला रहिवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता कर भरण्यास नागरिकांनी सुरुवात केली आहे.

ऑक्टोबर २०१६ ला महापालिकेची स्थापना झाल्यापासून मालमत्ता कर आकारला आहे. या कर आकारण्याला अनेक सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. याबाबत उच्च न्यायालयापासून ते अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मालमत्ता कराविरोधात लढाई सुरू आहे. त्यापैकी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, महापालिकेला २०१६ ऐवजी २०२१ मार्चपासून मालमत्ता कर आकारणीचे आदेश दिले, मात्र महापालिकेने २०१६ आणि २०२१ अशा दोन्ही स्वरूपातील कर आकारून बिल पाठवले. या मालमत्ता कराच्या आकारण्यावरून सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिकेवर न्यायालयाने अंतरिम निर्णय दिला आहे, मात्र अद्याप अंतिम निर्णय बाकी असल्याने बऱ्याच रहिवाशांनी मालमत्ता कर भरला नाही. त्यामुळे महापालिकेने तीन लाख ६४ हजार ३१८ मालमत्ताधारकांपैकी दोन लाख २९ हजार ९०२ मालमत्ता कर थकबाकीदारांना दंड ठोठावला. ही दंडाची रक्कम अधिक असल्याने महापालिकेचा मालमत्ता कर भरणा थांबला. अवाजवी दंड कमी करावा यासाठी विविध पक्षांनी केलेल्या आंदोलनानंतर अखेर १८ जुलैपासून महापालिकेने मालमत्ता करावर अभय योजना लागू केली आहे. योजनेनुसार महापालिकेने १८ जुलै ते २० सप्टेंबरपर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ९० ते २५ टक्क्यांपर्यंत दंडाच्या रकमेत सूट दिली आहे. ही सूट लक्षात घेता, महापालिकेच्या तिजोरीत १८ ते २० जुलै या तीन दिवसांत तब्बल नऊ कोटींचा मालमत्ता कर जमा झाला आहे. तसेच महापालिकेच्या ऑनलाइन प्रणालीवर हा आकडा वेगाने बदलत आहे.

# पनवेल मनपाच्या सर्व रस्त्यांची चाळण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता (बातमीदार)**

पनवेल महापालिका हद्दीतील सर्व रस्त्यांची चाळण झाली आहे. महापालिकेने प्रभागनिहाय चार कंत्राटदारांची नियुक्ती करून कोट्यवधी रुपयांच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्यांच्याकडे सोपवले

आहे, मात्र कोट्यवधी रुपये खर्चुनही परिसरातील रस्त्यांवर खड्डयांचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाने महापालिका प्रशासनाला निवेदन देऊन रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या

तक्रारीनंतर पालिकेचे अभियंता व ठेकेदारांनी परिसराची पाहणी करत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. मागील काही वर्षांपासून पनेवल शहराचा विकास झाला आहे. महापालिका अस्तित्वात आल्यानंतर शहरातील रस्त्यांची परिस्थिती बदलेल, अशी आशा व्यक्त केली गेली, मात्र रस्त्यांची परिस्थिती जैसे थे असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. पालिकेच्या ठेकेदारांकडून मोठ्या प्रमाणात रस्त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. मागील दोन वर्षांत लाखो रुपयांचा निधी खर्च करून शहरातील रस्त्यांची कामे करण्यात आली, मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने

यंदाच्या पावसाळयात शहरातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पनवेल रेल्वेस्थानकाबाहेरदेखील रस्त्यांची खड्यांमुळे चाळण झाली आहे. विशेष म्हणजे पुन्हा पैसे खर्च करून प्रत्येक प्रभागात रिसर्फेसिंग कामाचे

कार्यदिश काढण्यात आले आहेत. याला प्रहार जनशक्ती पक्षाने विरोध केला आहे. रस्ते दुरुस्तीचे कोट्यवधींचे कंत्राट दिल्यानंतर याची गरजच नव्हती, असा सवाल प्रहार जनशक्ती पक्षाचे सुनील शिरिषकर यांनी केला आहे. जनतेच्या पैशांची उधळपटी करणाऱ्या आणि बेजबाबदारपणे वागणाऱ्या प्रभागातील कनिष्ठ अभियंत्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी तक्रारही अभियंत्यांकडे करण्यात आली आहे.

# विजेविना कल्याण न्यायालयात न्यायप्रक्रिया ठप्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण | 21 जुलै** 2025 कल्याण येथील न्यायालयात सध्या एक विचित्र पण अत्यंत गंभीर स्थिती निर्माण झाली आहे — संपूर्ण न्यायालय वीजविना काम करत आहे! जवळपास 3,500 वकील कार्यरत असलेल्या या महत्त्वाच्या न्यायालयात तब्बल 21 न्यायदान कक्ष असूनही, विजेचा पुरवठा नसल्यामुळे संपूर्ण यंत्रणाच ठप्प झाली आहे. 10-12 वर्षांपूर्वी मिळालेला जनरेटर आज पूर्णतः निष्क्रिय आहे. कारण एकच — "पेट्रोल



किंवा डिझेल कोणी टाकायचे?" या जबाबदारीच्या अभावामुळे तो जनरेटर सडत पडला आहे. ना कोणी देखभाल केली, ना कोणी यंत्रणा उभी केली, आणि आता न्यायालय अंधारात आहे, अशी माहिती समोर आली आहे.

अशा परिस्थितीत पक्षकारांना न्याय कसा मिळणार? वकिलांनी मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडात आपले युक्तिवाद करायचे? आणि न्यायाधीशांनी ते ऐकायचेही त्या अंधारातच? हा न्यायाचा मंदिर आहे की व्यवस्थेचा उपहास? या बिकट परिस्थितीकडे सरकार, न्याय विभाग आणि न्यायालय प्रशासन यांचे लक्ष आहे का? लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या न्यायपालिकेला आज "लाइट" मिळत नसेल तर आपण खरोखरच लोकशाहीत आहोत का? हा केवळ वकिलांचा किंवा पक्षकारांचा नाही, तर प्रत्येक जागरूक नागरिकाचा प्रश्न आहे! अशी प्रतिक्रिया कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप यांनी दिली.

# तळोजा कारागृहात दोन बंदींकडून अन्य बंदीवर पत्र्याने हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल -** तळोजा मध्यवर्ती कारागृहात दोन न्यायबंदींकडून एका बंदीवर जुन्या वादातून धारदार पत्र्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कारागृहातील सर्कल अंमलदार पोलीस हवालदारांनी खारघर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्ला करणारे दोघेही बॉम्बस्फोट प्रकरणातील



बंदी आहेत.

कारागृहातील सर्कल क्र. १ मधील बॅरक क्र. १ मध्ये बंद असलेल्या गिरीश कुमारन नायर या बंदीवर शमिल साकिब नाचन आणि इरफान मुस्तफा लांडगे या दोघांनी अचानक हल्ला केला. यावेळी गिरीश नायर यांच्या छातीवर धारदार पत्र्याने वार करण्यात आला. हा पत्रा कारागृहात सुरू असलेल्या रंगकामासाठी वापरण्यात येत होता. हवालदार यांनी दिलेल्या जबाबानुसार, सर्कल उघडण्याच्या वेळेस अचानक ओरडण्याचा आवाज आल्याने ते शिपाईंसह संबंधित बॅरककडे गेल्यावर हा प्रकार दिसला. तत्काळ कारवाई करत जखमी नायर यांना कारागृहाच्या रुग्णालयामध्ये आणि त्यानंतर वाशी येथील मनपा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. सध्या त्यांच्यावर कारागृहाच्या रुग्णालयात देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.







# डि.वाय.फाऊंडेशनच्या भिवंडीतील शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वितरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून आपल्या जीवनात प्रगती करून आपल्या शाळेचे व पालकांचे नांव उज्वल करावे असे आवाहन डी.वाय.फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष तथा ठाणे ग्रामीण काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी आयोजित कार्यक्रमात केले आहे.

ठाणे जिल्ह्यात डी.वाय.फाउंडेशन संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य विषयक उपक्रमांध्ये कार्य आयोजित केले जातात या अंतर्गत भिवंडी तालुक्यातील आमणे, लोनाड, बापगाव, शिवनगर चौधरपाडा, देवरुंग, नांदकर, सांगे किरवली अशा विविध ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्या व विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण डी.वाय.फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दयानंद चोरघे यांच्या हस्ते सुमारे एक हजार हून अधिक विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी माजी सरपंच नवनाथ सुतार, माजी उपसरपंच किशोर भंडारी, देविदास केणे, युवा नेते विरेन चोरघे, योगेश पाटील, प्रकाश केणे, अनंता कोळी अदि मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डि.वाय. फाउंडेशनचे कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (चचठउ्ञ) मार्फत

# ठाणे महानगरपालिका क्षेत्रात रस्ते विकासाची कामे

## डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्र. ४, ५ व ६ या परिसरातील मंजूर विकास आराखड्यानुसार नियोजित रस्त्यांचा विकास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्यामार्फत करण्यात येत आहे. घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रस्त्यांची कामे डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देश परिवहन मंत्री श्री.प्रताप सरनाईक यांनी आज येथे दिले. मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात आयोजित बैठकीत ठाणे महापालिका क्षेत्रातील MMRDA च्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा घेत असताना ते बोलत होते.

यावेळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अतिरिक्त आयुक्त अश्विनकुमार मुदगल व विक्रम कुमार यांच्यासह अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, या प्रकल्पांतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी लक्षात घेऊन मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या परिसरातील डी.पी. रस्ते विकसित करण्यात येणार आहेत. मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेले सेवा मार्ग हे ३१ डिसेंबर अखेर मुख्य रस्त्याला जोडण्यात यावेत. तसेच मेट्रो स्थानकाचे जिने रस्त्याच्या मधोमध न उतरता ते रस्त्याच्या दोन्ही कडेला उतरण्यात यावेत.

हा प्रकल्प राबविल्यामुळे घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच परिसरातील नागरिकांना पर्यायी रस्ते उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे २० रस्त्यांपैकी ५ रस्त्यांचे स्वतंत्र सर्वेक्षण सुरू असून, उर्वरित १० रस्त्यांचे नवीन विकास काम लवकरच अंतिम करण्यात येणार आहे. ठाणे शहरातील वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी MMRDA व ठाणे महापालिका प्रशासनाने एकमेकांना सहकार्य करून गतीने प्रकल्प पूर्ण करावेत, असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

# कवि विजय पिलकर यांची 'काळजातील वात' प्रकाशित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यातील हरहुन्नरी कला शिक्षक असलेले कवि विजय पिलकर यांच्या "काळजातील वात" या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शहापूर येथील कै. विठ्ठलदादा खाडे सभागृहात महाराष्ट्राचे ख्यातनाम संगीतकार, सिनेपार्श्वगायक, लोककवी प्रशांत मोरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी शहापूर तालुका एज्यूकेशन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष जयवंत देशमुख, सचिव विद्या वेखंडे, विश्वस्त मंडळाचे सदस्य ॲड.निखिल खाडे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत वेखंडे व मुख्याध्यापक ज्ञानेश्वर तळपाडे व्यासपीठावर उपस्थित होते. या काव्य संग्रहासाठी जिवंत वाटावे अशा मुखपृष्ठाची रचना ठाणे जिल्ह्यात सुप्रसिद्ध असलेले आर्ट मास्टर किरण सोनावणे यांनी साकारले आहे.

"काळजातील वात" या काव्य संग्रहात ग्रामीण जीवनाची व्यथा व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न कवीने केला आहे. तथापि या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणार असल्याचा मानस कवि विजय पिलकर यांनी बोलून दाखवला. यावेळी श्रोते वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन बिरारी तर सूत्रसंचालन दिगंबर खरात यांनी केले.

# आदिवासी विभागाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी


## -जिल्हाधिकारी किशन जावळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : आदिवासी समाजातील नागरिकांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत असून या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित आदिवासी विभागाच्या विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्यचिकित्स श्री.पाटील, प्रकल्प संचालक, आदिवासी विभाग पेण आत्माराम धाबे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, रायगड विजय कुलकर्णी आदीसह इतर शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, जिल्ह्यातील आदिवासी समाजातील नागरिकांच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके आढावा घेणार आहेत. याकरिता प्रत्येक विभागाने आपली कामे पूर्ण करावीत. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM JANMAN)] धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियान, वनहक्क दावे व इतर योजना याबाबत काही प्रलंबित कामे असतील तर ती कामे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी उपस्थित सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



भक्ति मनुष्याला निर्भय बनवते. परमेश्वराच्या आश्रयाने माणसाला निर्भयता प्राप्त होते. परमेश्वराला उत्तम भावपूर्वक प्रणाम केला की ती निर्भयता आवश्य येते. ईश्वराला प्रेमच पाहिजे असते व तो प्रेमच देत असतो वंदन केल्याने ईश्वराची संबंध जोडला जातो.
गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# भिवंडीत तेलुगू समाजाचा पोषम्मा उत्सव संपन्न

## महिलांची वऱ्हाळा देवी मंदिरात गर्दी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : भिवंडी शहरपरिसरात तेलगू समाज बांधवांच्या वतीने पोषमा हा उत्सव मोठ्या उत्साहात धार्मिक कार्यक्रम आयोजित करून संपन्न झाला.

या निमित्ताने भिवंडी शहरातील कामतघर रोडवरील वऱ्हाळादेवी मंदिर पुजा करण्यासाठी शेकडो महिलांना गर्दी केली होती. भिवंडीची ग्रामदेवता असलेल्या वऱ्हाळादेवी मंदिरात दरवर्षी पोषम्मा बोनालू हा उत्सव मोठ्या संख्येने तेलुगू समाज बांधव साजरा करीत असतात. हा उत्सव म्हणजे जुलै-ऑगस्ट महिन्यात आषाढी पौर्णिमेनंतर आमावस्याच्या दरम्यान साजरा केला जातो. पोषम्मा ही देवी कालीचे एक रूप मानली जाते. आपल्या कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी देवीला साकडे घातले जाते, त्यातूनच कुटुंबाकडून देवीला कोंबडी, बकरा बळी देण्याचा प्रघात आहे. भिवंडीची गावदेवी म्हणून वऱ्हाळादेवीचा मान आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे. ग्रामदेवतांची पूजा बांधतात. त्यामुळे धार्मिक कार्यक्रम केले जातात. तेलुगू समाज मोठ्या प्रमाणात राहत असलेल्या कामतघर, मानसरोवर रोड, कोंबडपाडा, अंजूरफाटा, कारीवली नवी वस्ती, भंडारी कंपाउंड, कणेरी, गौरीपाडा आदी भागात हा सण आनंदात साजरा होत आहे. या उत्सवाच्या निमित्ताने कुटुंबातील महिला घरातील पावित्र्य जपून तांदूळ, गुळ आणि दुधाचे मिश्रण करून "बोनालू" नावाचा पदार्थ मातीच्या भांड्यात शिजवितात. ते प्रसादाचे भांडे हळदीने व कुंकवाने सजवून त्यावर तुपाची वात पेटवून कुटुंबातील महिला डोक्यावर कलश घेऊन देवीच्या मंदिरापर्यंत वाजतगाजत जात आहेत. हा नैवेद्य देवीला अर्पण केला जातो. त्यावेळी देवीला प्रसन्न करण्यासाठी मंदिरात विविध पारंपरिक नृत्य आणि गाणी सादर करतात. पद्मशाली समाजाचे प्रमुख कृष्णा गाजेंगी, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, भास्कर मंगलम, मारूती सर, मल्लेशम कोंका यांच्या सह मान्यवर समाज बांधव या कार्यक्रमात सहभागी होत मंदिराच्या ठिकाणी महिलांना पूजेसाठी विविध सोयी उपलब्ध करून देत त्यांना सणा निमित्त शुभेच्छा देत आहेत.

# पालकमंत्री एकनाथ शिंदे मुरबाडसाठी भरघोस निधी देतील

## - शिवसेना उपनेते प्रकाश पाटील यांचे मुरबाड मध्ये प्रतिपादन!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : शिवसेना पक्ष आणि युवा सेना मुरबाड तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कार्यकर्ता मेळावा व स्नेहभोजनाचा कार्यक्रम मुरबाड मधील सरळगाव येथील कावेरी हॉल येथे मोठ्या जल्लोषाच्या व उत्साही वातावरणात पार पडला. या प्रसंगी संपूर्ण परिसर भगवेमय झाले होते. शिवसैनिकांना मधील उत्साह व एकजूट यांचा प्रत्यय या मेळाव्यात दिसून आला.

सर्व सेना नेत्यांचे स्वागत मुरबाड तालुका प्रमुख कांतिलाल कंटे यांनी केले. नेतृत्व म्हणजे जबाबदारी या मेळाव्यास शिवसेना उपनेते प्रकाश पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून कार्यकर्त्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जनतेसाठी नेहमीच कार्यरत राहिले आहेत. माध्यमांवर टीका-टिप्पणी न करता, ते थेट जनतेसाठी योजना आणतात, हीच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे." कार्यकर्त्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून लोकसेवा करावी, अशा प्रकारचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. "नेतृत्व ही केवळ पदं नसून ती जबाबदारी आहे, आणि कार्यकर्त्यांच्या आधारावरच कोणताही नेता मोठा होतो," असे मतही त्यांनी व्यक्त केले. पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री मंत्री एकनाथ शिंदे मुरबाड साठी निधी कमी पडू देणार नसून पक्ष वाढीसाठी कार्यकर्तांना निश्चित बळ मिळेल तसेच येणार्या निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढणार असल्याचा संकेत त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

या कार्यक्रमास राज्य उपसचिव एकनाथ शेलार, जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, ठाणे जिल्हा विभाग प्रमुख एकनाथ भोईर, उपजिल्हाप्रमुख सुदाम पाटील, मुरबाड तालुका संपर्कप्रमुख संतोष जाधव, मुरबाड तालुका प्रमुख कांतिलाल कंटे, संजय भानुशाली (उपजिल्हा प्रमुख), विलास आप्पा देशमुख (उप जिल्हा प्रमुख), विधानसभा संपर्कप्रमुख कल्पेश धुमाळ, कल्याण मुरबाड समन्वयक भरत (आप्पा) यशवंतराव, मा. जिल्हा महिला प्रमुख उर्मिला लाटे, मुरबाड महिला आघाडी प्रमुख देवयानी दळवी, युवा सेना तालुकाध्यक्ष साईनाथ भोईर, नगरसेवक विनोद नार्वेकर, गटनेते शिवसेना तथा नगरसेवक नितीन (अण्णा) तेलवणे, नगरसेवक अक्षय रोठे, नगरसेविका नम्रता नितीन तेलवणे, मुरबाड तालुक्यातील ज्येष्ठ शिवसैनिक सरपंच राम सासे, दिनेश धलपे (तालुकाध्यक्ष जिजाऊ संस्था) विधानसभा संघटक भरत गायकर, सज्जन जमदरे, प्रसिद्धी प्रमुख नरेश म्हाडसे आणि व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

# 'डिजिटल गव्हर्नन्स' ही गरज नाही तर आवश्यकता

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्राने डिजिटल रेग्युलेशन आणि प्रणालीमध्ये आघाडी घेतली आहे. त्यामुळे डिजिटल गव्हर्नन्स ही गरज नाही तर आवश्यकता आहे. त्यामुळे सर्व शासकीय सेवा, शासकीय योजना ह्या ऑनलाईन प्रणाली माध्यमातून लोकांपर्यंत सहज पोहोचतील. सामान्य लोकांना एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा मिळतील. 'नो ऑफीस डे' म्हणजे कोणत्याही व्यक्तींला कार्यालयात यावे लागणार नसल्याने ऑफलाईन प्रक्रिया संपेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'समग्र' या संस्थेसोबत यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंग चहल, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे व्यवस्थापकीय संचालक कान्हुराज बगाटे, विकास आयुक्त दिपेंद्रसिंग कुशवाह, 'समग्र'चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी

**• माहिती तंत्रज्ञान संचालनालय आणि 'समग्र' संस्थेदरम्यान सामंजस्य करार**

गौरव गोयल, मुख्य तंत्रज्ञ राहुल कुलकर्णी, व्यवस्थापक अनय गोगटे, संचालक अल्केश वाढवाणी आदी उपस्थित होते.

या ऑनलाईन प्रक्रियेत सर्व व्यक्तींनी सहभागी होणे आवश्यक असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, व्हॉट्सॲपसारख्या प्लॅटफॉर्मवर सर्व शासकीय सेवा आणल्या जात आहेत. कारण सर्वसामान्य व्यक्तींना व्हॉट्सॲपचा वापर करणे सोपे ठरते आहे. या प्रक्रियेसाठी वेळापत्रक ठरवून काम करण्यात येईल तसेच यासाठी प्रत्येक विभागाकरिता उद्दिष्ट आणि कालमर्यादा देखील ठरविली जातील. त्यामुळे या सेवा लवकरात लवकर सामान्यांपर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे.

सर्व शासकीय सेवा ऑनलाईन देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम केल्याने शासकीय सेवा सक्षमपणे लोकांसमोर येतील आणि यामुळे विश्वासार्हता वाढेल, असे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यावेळी म्हणाले. माहिती तंत्रज्ञान विभाग आणि समग्र या संस्थेसोबत झालेल्या करारामुळे होणाऱ्या मुलभूत परिवर्तनास मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

# शिधापत्रिका ई-केवायसीसाठी मुदतवाढ!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शिधापत्रिकेवर मिळणारे लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी करणे बंधनकारक आहे त्यासाठी आता शासनाने 31 जुलै पर्यंत मुदतवाढ दिली असून असून रेशनकार्ड धारक लाभार्थ्यांनी या मुदतीत ई-केवायसी करून घ्यावी असे आवाहन तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या अन्न, नागरी पुरवठा विभागाकडून लाभ मिळणाऱ्या रेशनकार्ड धारक लाभार्थ्यांसाठी शिधापत्रिका ई-केवायसी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अनुषंगाने ही मुदतवाढ देऊन तालुका पुरवठा विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे. रेशनकार्डवर मिळणारे लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले असून फक्त पात्र कुटुंबांनाच अनुदानित अन्नधान्य मिळेल हे सुनिश्चित करण्यासाठी ई-केवायसी करणे आवश्यक आहे. तसेच ई-केवायसी न केल्यास रेशनचा लाभ बंद होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान शहापूर तालुक्यात 2 लाख 18 हजार 660 एकूण लाभार्थी असून यामध्ये 1 लाख 72 हजार 811 लाभार्थ्यांनी ई-केवायसी केलेली असून अद्याप 45 हजार 849 रेशनकार्ड धारक लाभार्थी बाकी आहेत असे पुरवठा अधिकारी अमृता सुर्यवंशी यांनी सांगितले. तर या दिलेल्या मुदतीत लाभार्थ्यांनी शिधापत्रिका ई-केवायसी करून घ्यावीत तसेच गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळणेकरिता सधन लाभार्थींनी अन्न सुरक्षा योजनेनेतून बाहेर पडून शासनाच्या मोहिमेस सहकार्य करावे. असे आवाहनही पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

# ऋणानुबंध या कवितासंग्रहाचे प्रकाशन!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : शिक्षण परिषद केंद्र नडगाव केंद्रातील जिल्हा परिषद शाळा शिरगाव येथे नुकताच दोनघर येथील जिल्हा परिषदेचे मुख्याध्यापक प्रदीप चव्हाण यांच्या ऋणानुबंध या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले.

या प्रकाशन सोहळयासाठी ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, शहापूर चे गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण विस्तार अधिकारी हिराजी वेखंडे संगीता माळी व नडगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख संगीता पवार, पर्यावरण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय चोंघळा शारदा इंग्लिश मिडीयमचे प्राचार्य प्रशांत जाधव, सचिन ढमणे दिलीप ठाकरे या सर्वांचे मला मोलाचे मार्गदर्शन लाभले असून हे सर्व अतिथी मान्यवर या प्रकाशन सोहळयासाठी आवर्जून उपस्थित होते या सर्वांनी प्रदीप चव्हाण यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या व असेच सुंदर व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर कवितासंग्रहाचे लिखाण होत राहील असा आशावादही व्यक्त केला. यावेळी योगेश जोशी नेहाते सर व त्यांच्या सौभाग्यवती संजीवनी चव्हाण मुलगा प्रथमेश चव्हाण आर्या चव्हाण ज्येष्ठ बंधू शांताराम चव्हाण आधी जण उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## विक्रांत जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते

# कल्याण पूर्वेतील प्रभागातील विकास कामांचे भुमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण पूर्वेला प्रभाग क्रमांक 49 , 88 आणि 92 मध्ये मूलभूत सुविधां करिता निधी मिळावा म्हणून कल्याण पूर्वेतील मा. आमदार जगन्नाथ (आप्पासाहेब) शिंदे यांच्या प्रयत्नाने कल्याण पूर्वेच्या विकासासाठी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्याकडे निधीची मागणी केली होती आणि खासदार डॉक्टर शिंदे यांनी त्वरित निधी मंजूर करून कल्याण पूर्वेच्या विकासाला चालना दिली.

खासदार डॉक्टर श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या खासदार निधीतून कल्याण पूर्वेला प्रभाग क्रमांक 49 मध्ये पायवटा बनवण्यासाठी दाहालक्ष रुपये निधी देण्यात आला.

प्रभाग क्रमांक 88 मध्ये बंदिस्त गटाराकरिता 25 लक्ष रुपये निधी देण्यात आला.

प्रभाग क्रमांक 92 मध्ये नाला बनवण्याकरता 25 लक्ष रुपये निधी देण्यात आला.

कल्याण पूर्वेतील या तिन्ही प्रभागात रविवार दिनांक 20 जुलै रोजी सकाळी 11 वाजता विक्रांत जगन्नाथ शिंदे 142 विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी समाजसेवक आणि कॉन्ट्रॅक्टर विजय भोसले आणि अनेक कार्यकर्त्यां सोबत भूमिपूजन करण्यात आले.

कल्याण पूर्व जिल्ह्यातील प्रभागात कार्यकर्त्यांमध्ये आणि स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कल्याण सुप्रसिद्ध पूर्वेतील समाजसेवक आणि महापालिका कॉन्ट्रॅक्टर विजय भोसले, विक्रांत जगन्नाथ शिंदे 142 विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. मनोज नायर जिल्हा सरचिटणीस, देवाबा सूर्यवंशी जिल्हा सचिव, कमलेश ठाकरे जिल्हाध्यक्ष, हरिश्चंद्र चेन्ने, विधानसभा सरचिटणीस. हे प्रभाग क्रमांक 49 चे कार्यकर्ते उपस्थित होते प्रभाग क्रमांक 88 चे कार्यकर्ते सौ अनिता पाटील, प्रभाग क्रमांक 92 मधील रुपेश मोरे, सौ.अनिता परब आणि हरिश्चंद्र चेन्ने असे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*